CMYK

## साधूग्रामसाठी एक वृक्ष तोडल्यास दहा नवीन वृक्ष लावणार, मंत्री गिरीश महाजन यांचे आश्वासन

>> पान 2

## टोयोटा किर्लोस्कर मोटार कंपनी आणि व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयामध्ये सामंजस्य करार

>> पान 3

## तिरंगी लढतीत किशोरभाऊ गारोळे यांचे पारडे भक्कम!

>> पान 4

### सुविचार

''प्रयत्न तोच खरा, जो यशाला आकार देतो.''



# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 107 ■ शुक्रवार, दि. 21 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

सोनम कपूरनं दुसऱ्या गरोदरपणाची केली घोषणा

आतील पान

# नितीश कुमार यांनी दहाव्यांदा मुख्यमंत्रिपदाची घेतली शपथ

## पंतप्रधान मोदी, अमित शाह, जेपी नड्डा यांची उपस्थिती

**पाटणा/वृत्तसंस्था :** बिहार विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या प्रचंड विजयानंतर संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष नितीश कुमार यांनी गुरुवारी दहाव्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. बुधवारी झालेल्या एनडीए विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत पाचही पक्षांच्या आमदारांनी नितीश कुमार यांची विधिमंडळ पक्षाचा नेता म्हणून निवड केली.

गांधी मैदानावर शपथविधी समारंभ : बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएनं २४३ पैकी २०२ जागा जिंकून मोठा विजय मिळवला. नितीश कुमार यांनी गुरुवारी गांधी मैदानावर पुन्हा एकदा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आहे. या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह १६ राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते.

बिहारला पुन्हा एकदा दोन उपमुख्यमंत्री : नितीश कुमार यांच्यानंतर सम्राट चौधरी यांनी शपथ घेतली. राज्यपालांनी त्यांना शपथ दिली. सम्राट चौधरी यांनी तारापूर विधानसभेची जागा जिंकली. सम्राट चौधरी हे बिहारचे उपमुख्यमंत्री असतील. सम्राट चौधरी यांच्यानंतर विजय सिन्हा यांनी शपथ घेतली आहे. विजय सिन्हा दे देखील पुन्हा एकदा बिहारचे उपमुख्यमंत्री बनले आहेत. बिहार मंत्रिमंडळात लखेंद्र कुमार रोशन, श्रेयसी सिंह, प्रमोद कुमार, संजय कुमार, संजय कुमार सिंह आणि दीपक प्रकाश यांनी राज्यमंत्री म्हणून शपथ घेतली.



पंतप्रधान मोदी यांनी दिल्या शुभेच्छा : शपथविधी समारंभाच्या समाप्तीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गांधी मैदानावर लोकांचं स्वागत केलं आणि त्यांचा खास गमछा उडवून बिहारच्या जनतेचे आभार मानले. दरम्यान, शपथ घेतल्यानंतर नितीश कुमार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अभिवादन केलं. या कार्यक्रमाला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, त्याचसोबत एनडीए राज्यांचे मुख्यमंत्री, वरिष्ठ नेते उपस्थित होते.

नितीश कुमार यांनी बुधवारी राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा सादर केला. त्यांच्यासोबत केंद्रीय मंत्री चिराग पासवान, राष्ट्रीय लोक मोर्चाचे नेते उपेंद्र कुशवाह आणि उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य होते.

## पुणेकरांसाठी गुडन्यूज; म्हाडाच्या ४१८६ घरांसाठी सोडत, अर्ज करण्यासाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा घटक) पुणे, पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीएसह सोलापूर, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील विविध गृहनिर्माण योजनेतील ४,१८६ सदनिकांच्या विक्रीकरिता आयोजित संगणकीय सोडतीसाठी अर्ज सादर करण्यासाठी ३० नोव्हेंबर, २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे, पुणेकरांना किंवा पुण्यात घर घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांना आणखी एक संधी मिळाली आहे.

पुण्यातील ४१८६ सदनिकांसाठी आतापर्यंत १,८२,७८१ ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी १,३३,८८५ अर्ज अनामत रकमेसह प्राप्त झाले आहेत. मंडळातर्फे सदनिका विक्रीसाठी ऑनलाईन संगणकीय सोडत दि. ११ डिसेंबर, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता काढण्यात येणार आहे. दिनांक ३० नोव्हेंबर, २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत अर्जदार ऑनलाइन अनामत रकमेचा भरणा करू शकणार आहेत. दिनांक ०१ डिसेंबर, २०२५ रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत ठढऋड/छएऋढ द्वारे अनामत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येईल.

## ऐन निवडणुकीच्या रणधुमाळीत शरद पवारांच्या राष्ट्रवादीला धक्का, अनिल देशमुख यांचे पुत्र सलील देशमुख यांचा राजीनामा

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यात सध्या नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. येत्या काही दिवसात जिल्हा परिषद पंचायत समिती आणि त्यानंतर महापालिका निवडणुका जाहीर होणार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांची रणधुमाळी सुरु असतानाच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाला मोठा धक्का बसला आहे. पक्षाचे ज्येष्ठ नेते अनिल देशमुख यांचे पुत्र सलील देशमुख यांनी पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. यासाठी त्यांनी प्रकृतीचे कारण दिले आहे.

माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे सुपुत्र सलील देशमुख यांनी शरद पवार गटाचा पक्षाचा सक्रिय सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. सलील देशमुख यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार यांना राजीनामा पाठवला आहे.

एकीकडे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका सुरू असताना सलील देशमुख यांनी अचानकपणे प्रकृतीचे कारण दिलं आहे. डॉक्टरांनी सांगितल्यामुळे मी आराम करत आहे. त्यासाठी राजीनामा दिल्याचे सलील कुलकर्णी यांनी सांगितलं.

उद्या दुसऱ्या पक्षात जाणार आहे का या प्रश्नावर उत्तर देताना ते म्हणाले उद्याची परिस्थिती काय असेल ते माहित नाही. मात्र सध्या प्रकृतीच्या कारणांनी मी राजीनामा देत असल्याचं सुतोवाच सलील देशमुख यांनी केलं. आता सलील देशमुख यांनी सध्या प्रकृतीचं कारण दिलं आहे.

# ताम्हिणी घाटात ५०० फूट खोल दरीत कोसळली थार

## ४ तरुणांचा मृत्यू, दोघांचा शोध सुरु; २० दिवसांपूर्वीच घेतली होती नवीन गाडी

**रायगड : पुण्यावरुन कोकणात जाताना रायगड जिल्ह्यातील ताम्हिणी घाटात थार कारचा भीषण अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. चक्क ५०० फूट खोल दरीत ही थार कार कोसळली. या दुर्घटनेत कारमधील ४ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघाताची माहिती मिळताच येथील सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था आणि रेस्क्यू टीमकडून थारमधील इतरांसाठी शोध मोहीम राबविण्यात आली. परवा मंगळवारी रात्री हा अपघात झाला असून नातेवाईकांनी शोधाशोध सुरू केल्यानंतर आज ही घटना उघडकीस आली.**



दरम्यान, २० दिवसांपूर्वीच घेतलेली नवीन थार कार घेऊन हे पर्यटक कोकणात फिरायला निघाले होते. मात्र, या तरुणांवर काळाने घाला घातल्याची हृदयद्रावक घटना घडली.

रायगड जिल्ह्यातल्या ताम्हिणी घाटामध्ये एक थार कार ५०० फूट खोल दरीत कोसळल्याची दुर्घटना घडली. थार चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार थेट दरीत कोसळली. या कारमधून एकूण ६ प्रवाशी प्रवास करत होते. परवा मंगळवारी रात्री हा अपघात झाला होता. मात्र, बेपत्ता व्यक्तींच्या नातेवाईकांनी चौकशी केली असता त्यांचे लोकेशन रायगड आणि पुणे या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या ताम्हिणी घाटात सापडल्याने आज या घटनास्थळी शोध सुरू करण्यात आला. शोधमोहीमेत आतापर्यंत चौघांचे मृतदेह आढळून आले आहेत. मात्र, उर्वरित २ जण अजूनही बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. सह्याद्री वन्यजीव सामाजिक संस्थेच्या रेस्क्यू टीमकडून या अपघातातील बेपत्ता असलेल्या दोघांचा शोध सुरू आहे. बेपत्ता झालेले सर्व पुरुष असल्याचीही माहिती समोर आलीय.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच माणगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून पंचनामा करण्यात आला. तसेच, अपघाताचे नेमकं कारण अजून स्पष्ट झालेलं नाही. मात्र प्रथमदर्शनी चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्यानेच गाडी दरीत कोसळली असावी. ड्रोनद्वारे परिसराची तपासणी सुरू असून चार मृतदेह आढळून आले आहेत. ते वर आणण्याचे काम सुरू आहे. बचाव पथक दोरखंड, क्रेन आणि इतर उपकरणांच्या मदतीने हे रेस्क्यू ऑपरेशन करत आहे. वाहनात आणखी प्रवासी होते का, याचा तपासही सुरू असल्याची माहिती माणगावचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोराडे यांनी दिली. दरम्यान, मृतांची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे.

# मुख्यमंत्र्यांपुढे ठरलं तरीही फोडाफोडी सुरूच

**हिंगोली/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महायुती आणि महाविकास आघाडीत कुरघोडीचं राजकारण पाहायला मिळत आहे. महायुतीमधील भाजप आणि शिवसेना पक्षात तर महाविकास आघाडीतील शिवसेना आणि काँग्रेसमध्ये तणाव निर्माण झाल्याचं पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, गेल्या काही दिवसात शिवसेना आणि भाजपमधील फोडाफोडीच्या राजकारणाचा वाद चांगलाच रंगला असून थेट दिल्लीपर्यंत पोहोचल्याचं दिसून आलं. शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्लीत जाऊन गृहमंत्री अमित शाहांची भेट घेतली. या भेटीत महायुती, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या तक्रारी केल्याची माहिती आहे. एकीकडे भाजपकडून शिवसेना उमेदवारांना पळवलं जात असल्याच्या तक्रारी असतानाच हिंगोलीत शिवसेनेनंच भाजपचा अधिकृत उमेदवार पळवल्याचं पाहायला मिळालं.

राज्यात एकीकडे भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे शिवसेनेच्या नगरसेवकांचा भाजपमध्ये प्रवेश घडवून आणत असल्यामुळे एकनाथ शिंदे नाराज असताना हिंगोली नगरपालिका निवडणुकीत एकनाथ शिंदे यांचे विश्र्वासू असलेले आमदार संतोष बांगर यांनी भाजपचे नगरसेवकपदाचे अधिकृत असलेल्या उमेदवाराला उमेदवारी मागे घ्यायला लावत शिवसेनेत प्रवेश दिला. हिंगोली नगरपालिकेमधील प्रभाग १६ ब मध्ये भाजपचे अधिकृत उमेदवार असलेले भास्कर बांगर यांनी उमेदवारी मागे घ्यायला एक दिवस शिल्लक असताना आज निवडणुकीतून स्वतःची माघार घेतली. संतोष बांगर यांच्याहस्ते त्यांचा शिवसेनेमध्ये प्रवेश झाला असून भास्कर बांगर यांनी शिवसेनेचे उमेदवार श्याम कदम यांना आपला पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे, नगरपालिका निवडणुकीतील फोडाफोडीच्या या राजकारणात भाजपला हा स्थानिक राजकारणातील मोठा धक्का मानला जात आहे.

दरम्यान, महायुतीमधील फोडाफोडीच्या राजकारणावरुन शिवसेना मंत्र्यांनी नाराजी व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. त्या भेटीमध्ये यापुढे कोणीही एकमेकांच्या पक्षाचे नेते, पदाधिकारी व उमेदवार घ्यायचे नाहीत, असे ठरल्याचं प्रताप सरनाईक यांनी सांगितले. मात्र, दुसऱ्याच दिवशी हिंगोलीत शिवसेनेनं भाजप उमेदवार पळवला.

# राज्यपालांनी विधानसभेची मंजूर विधेयके लटकावू नये

## विधेयके मंजूर करा, परत करा वा राष्ट्रपतींना पाठवा; डेडलाइन नाही, परंतु विलंब झाल्यास हस्तक्षेप करू : सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने राज्यपाल आणि राष्ट्रपती यांच्या अधिकारांसंदर्भात, विशेषत: राज्य विधिमंडळाने पारित केलेल्या विधेयकांवर निर्णय घेण्याबाबत वेळ-सीमा निर्धारित केली जाऊ शकत नाही, असे म्हटले आहे. तसेच राज्यपालांनी विधेयके प्रलंबित ठेवू नयेत, असे सांगत एकप्रकारे अप्रत्यक्षरित्या कानपिचक्या सुद्धा दिल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या ५ सदस्यीय संविधान पीठाने सर्वसंमतीने निर्णय दिला की, राज्य विधानसभांनी पारित केलेल्या विधेयकांना राज्यपाल आणि राष्ट्रपती यांनी मंजुरी देण्यासाठी कोणतीही वेळ-सीमा निर्धारित केली जाऊ शकत नाही. न्यायालयीन प्रक्रियेद्वारे राज्यपाल किंवा राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी वेळ-सीमा निश्र्चित करणे योग्य नाही, असे संविधान पीठाने स्पष्ट केले.**

**तर न्यायालय हस्तक्षेप करू शकते**

जरी वेळेची मर्यादा निश्र्चित केली गेली नसली तरी, जर विधेयकांच्या मंजुरीमध्ये दीर्घकाळ, कोणत्याही कारणाशिवाय, किंवा अनिश्र्चित काळासाठी विलंब झाला, तर न्यायालय हस्तक्षेप करू शकते आणि मर्यादित निर्देश जारी करू शकते.

**राष्ट्रपतींच्या बाबतीतही हाच नियम लागू होतो**

दीर्घकाळ कारवाई न झाल्यास, संवैधानिक न्यायालय आपले संवैधानिक पद वापरू शकते, जरी न्यायिक पुनर्विलोकनावर पूर्णपणे बंदी आहे.

**राज्यपालांचे संवैधानिक पर्याय**

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की राज्यपालांकडे विधेयकांवर कारवाई करण्यासाठी तीन घटनात्मक पर्याय आहेत:

१. मंजुरी देणे (विधेयकाला संमती देणे).

२. विधेयक पुनर्विचारासाठी विधानसभेकडे परत पाठवणे.

३. मंजुरीसाठी विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवणे.

राज्यपालांना विधानसभांनी मंजूर केलेल्या विधेयकांना पूर्णपणे रोखून ठेवण्याचा अधिकार नाही, असे न्यायालयाने म्हटलं आहे. राज्यपाल हे विधेयक कायद्यात रूपांतरित करण्याच्या प्रक्रियेत केवळ एक रबर स्टॅम्प नाहीत. घटनेच्या अनुच्छेद २०० आणि २०१ अंतर्गत राज्यपालांचे अधिकार त्यांच्या विवेक वर अवलंबून असतात. कोणत्याही विधेयकावर निर्णय घेताना राज्यपाल मंत्रिपरिषदेच्या सल्ल्याने बांधलेले नसतात.

**व्हेटो पॉवर आणि पुनर्विचार संबंधी नियम**

सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी (८ एप्रिल रोजी) आदेश दिला होता की राज्यपालांकडे कोणताही व्हेटो पॉवर नाही.

राज्यपालांना अनिश्र्चित काळासाठी मंजुरी रोखून ठेवण्याचा अधिकार नाही.



सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, निवडून आलेली सरकारे राज्यपालांच्या मर्जीनुसार चालू शकत नाहीत.

जर एखादे विधेयक राज्य विधानसभेकडून मंजूर होऊन दुसऱ्यांदा राज्यपालांकडे आले, तर राज्यपाल ते विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवू शकत नाहीत.

न्यायपालिका अनुमानित मंजुरी देऊ शकत नाही

अनुमानित मंजुरीचा अर्थ असा आहे की, जर राज्यपाल किंवा राष्ट्रपती यांच्याकडे मंजुरीसाठी बिल गेले आणि त्यांनी वेळेवर प्रतिसाद दिला नाही, तर कायद्यानुसार ते मंजूर झाले आहे असे मानले जाते. सर्वोच्च न्यायालयाने ही व्यवस्था नाकारली.

काय आहे वादाची पार्श्र्वभूमी?

हा संपूर्ण खटला तामिळनाडूचे राज्यपाल आणि राज्य सरकार यांच्यातील वादामुळे उभा राहिला होता, जिथे राज्यपालांनी राज्य सरकारची विधेयके रोखून ठेवली होती. यापूर्वीच्या एका आदेशात असे म्हटले होते की राज्यपालांनी राष्ट्रपतींकडे पाठवलेल्या विधेयकांवर राष्ट्रपतींनी ३ महिन्यांच्या आत निर्णय घेणे आवश्यक आहे. (या आदेशानंतर राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाकडून मत विचारून १४ प्रश्न विचारले होते). केंद्र सरकारने असा युक्तिवाद केला होता की, राज्यपाल विधेयकांवर निर्णय घेत नसतील तर राज्यांनी न्यायालयात जाण्याऐवजी संवादाने प्रश्न सोडवावेत.





CMYK

## शेख हसिना यांना मृत्युदंडाची शिक्षा का सुनावण्यात आली ?

बांगलादेशच्या इंटरनॅशनल क्राइम्स ट्रिब्यूनलने माजी पंतप्रधान शेख हसिना यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली. बांगलादेशच्या हंगामी सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी शेख हसिना यांना सुनावण्यात आलेल्या शिक्षेचे स्वागत केले असून भारताने शेख हसिना यांना बांगलादेशच्या स्वाधीन करावे असे आव्हान केले. दोन वर्षापूर्वी बांगलादेशमध्ये जो उठाव झाला त्या उठावानंतर बांगलादेशमध्ये सत्तेवर असलेल्या त्या देशाच्या तत्कालीन पंतप्रधान शेख हसिना यांनी भारतात पलायन केले त्या अजूनही भारतातच आश्रयाला आहेत. शेख हसिना यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावल्यानंतर बांग्लादेशात पुन्हा हिंसाचार उसळला शेख हसिना यांच्या समर्थकांनी बांग्लादेशात धुडगूस घातला अजूनही तेथे उग्र निदर्शने होत आहेत मात्र तेथील हंगामी सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस हे आंदोलकांना दाद देत नाहीत. मोहम्मद युनूस यांनी तेथील प्रसार माध्यमांना शेख हसिना यांची या शिक्षेवरील प्रतिक्रियाही छापण्यास मनाई केली आहे. मोहम्मद युनूस शेख हसिना यांना लवकरात लवकर मृत्युदंड देण्यावर ठाम आहे पण भारत शेख हसिना यांना बांगलादेशच्या स्वाधीन करेल असे वाटत नाही. शेख हसिना या भारताच्या आश्रित आहे आहे त्यांची सुरक्षा ही भारताची जबाबदारी आहे. शेख हसिना यांना सुनावण्यात आलेली शिक्षा अपेक्षितच होती कारण काही महिन्यापूर्वी भारतीय प्रसार माध्यमांशी बोलताना शेख हसिना यांनी बांग्लादेशात परतण्याची घोषणा केली होती. शेख हसिना यांनी बांग्लादेशात परतण्याची घोषणा केल्यापासून मोहम्मद युनूस हे अस्वस्थ आहेत. पंतप्रधान पदावर असलेल्या शेख हसिना यांना हिंसक निदर्शनांमुळे देश सोडवा लागल्यावर तात्पुरती व्यवस्था म्हणून हंगामी सरकार स्थापन करण्यात आले. या सरकारचे हंगामी प्रमुख म्हणून नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनूस यांची नियुकी करण्यात आली. त्यांची नियुक्ती करण्यात आली त्याचवेळी सांगण्यात आले की सहा महिन्याच्या आत निवडणूका घेऊन लोकनियुक्त सरकार स्थापन करण्यात येईल मात्र दोन वर्ष झाली तरी मोहम्मद युनूस निवडणुकीची घोषणा करत नाही. त्यांना भीती आहे की निवडणूक झाली तर ते पुन्हा पंतप्रधान होणार नाहीत. काहीही करून आपली खुर्ची टिकवण्यासाठी ते धडपडत आहेत त्यासाठी ते अमेरिका पाकिस्तान आणि चीनची मदत घेत आहेत. शेख हसिना यांच्या विरोधात झालेल्या आंदोलनामागे अमेरिका होती हे आता लपून राहिले नाही. अमेरिकेला बांगलादेशातील सेंट मार्टिन हे बंदर हवे आहे. शेख हसिना अमेरिकेस हे बंदर देण्यास उत्सुक नव्हत्या त्यामुळेच अमेरिकेने बांगलादेशातील शेख हसिना यांच्यावर नाराज असलेले नागरिक तसेच कट्टरपंथीयांना हाताशी धरून शेख हसिना यांचे पंधरा वर्षाचे सरकार उधळून लावले. पाकिस्तान आणि चीनलाही त्या नकोशा होत्या कारण सत्तेवर असताना त्यांचे भारताशी सौहार्दाचे संबंध होते पाकिस्तान आणि चीनला त्या नकोशा होत्या म्हणून त्यांनीही या आंदोलनाला हवा दिली आणि मोहम्मद युनूस नावाचे बाहुले आणून बसवले. हेच मोहम्मद युनूस आज अमेरिका, चीन आणि पाकिस्तान यांच्या नादी लागून भारताला पाण्यात पाहत आहेत. मोहम्मद युनूस जितके दिवस खुर्चीवर राहतील तितका अमेरिका, पाकिस्तान आणि चीनचा फायदा होणार आहे. पुढील काही महिन्यात मोहम्मद युनूस हे सेंट मार्टिन बेट अमेरिकेच्या घशात घालणार आहेत. जर शेख हसिना बांग्लादेशात आल्या आणि निवडणुका झाल्या तर नवीन सरकार आपल्या विचारांचे असेलच असे नाही आणि जर शेख हसीनांचेच सरकार पुन्हा आले तर त्या भारताशीच मैत्री करणार हे चीन आणि पाकिस्तान जाणून आहेत त्यामुळे त्यांनी बांगलादेशात येऊच नये आणि जरी आल्या तरी त्यांना थेट ढगात पाठवून आपले मनसुबे पूर्ण करण्याचा अमेरिका, चीन आणि पाकिस्तान यांचा डाव आहे त्यासाठीच शेख हसिना यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

# साधूग्रामसाठी एक वृक्ष तोडल्यास दहा नवीन वृक्ष लावणार, मंत्री गिरीश महाजन यांचे आश्वासन

**दैनिक आपला विदर्भ**

**नाशिक/प्रतिनिधी :** आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर तपोवन भागात साधूग्रामसाठी १७०० वृक्ष तोडली जाणार आहे. यासाठी वृक्षप्रेमींनी विरोध दर्शवत ४०० हरकती दाखल करत आंदोलन सुरू केलं होतं. दरम्यान, गुरूवारी (२० नोव्हेंबर) मंत्री गिरीश महाजन तपोवन परिसराची पाहणी करून वृक्षप्रेमींची भेट घेतली. यावेळी साधूग्रामसाठी एक वृक्ष तोडल्यास त्याबदल्यात दहा नवीन वृक्ष लावणार असल्याचं आश्वासन गिरीश महाजन यांनी वृक्षप्रेमींना दिले आहे.

'प्रयागराजच्या धर्तीवर नाशिकमध्ये कुंभमेळ्यासाठी खूप कमी जागा आहे. या जागेत नियोजन केलं जात आहे. या सिंहस्थ कुंभमेळ्यात मागील कुंभमेळ्यापेक्षा कित्येक पटीनं साधू महंत तसेच भाविक येतील असा अंदाज आहे. यामुळे



प्रशासनाला तयारी करणं गरजेचे आहे. म्हणून साधुग्रामसाठी काही झाडे तोडू तसंच काही स्थलांतरित करू,असे मंत्री गिरीश महाजन यांनी म्हटले आहे.

नाशिकमध्ये याआधी अनेक कुंभमेळे झाले. मात्र त्यासाठी मोठ्या वृक्षांवर कुऱ्हाड चालवली गेली नाही. आता साधूग्राम साकारण्यासाठी जुनी आणि भव्य वड, चिंच, पिंपळ, उंबर या झाडांवर देखील महानगरपालिकेकडून पिवळी फुली मारण्यात आली आहे. कुंभमेळ्यासाठी आमचा विरोध नाही. पण, त्यासाठी १०० वर्षापूर्वीची मोठी झाडे तोडण्यात येणार असतील तर आमचा विरोध असेल,'' असे कपिलानदी संवर्धन समितीचे योगेश बर्वे यांनी म्हटले आहे.

जे झाड बांधकाम बाधित आहे. त्याचे वय दहा वर्षापेक्षा कमी आहे. तेच वृक्ष तोडले जाणार आहे. तसेच दहा वर्षापेक्षा कमी वयाचं झाड तोडल्यास, त्या वयाच्या संख्येने नवीन झाडे लावण्याचा नियम आहे. जर सात वर्षाचं झाड तोडले तर सात नवीन झाडे लावली जाणार आहेत. जुने झाड जतन करण्याची जबाबदारी ही महानगरपालिकेची आहे,'' असे अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर यांनी म्हटले आहे.

नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा होत आहे. या अनुषंगाने नाशिकच्या तपोवन परिसरात १२०० एकर जागेवर साधूग्राम साकारण्यात येणार आहे. याचं काम नाशिक महानगरपालिकेच्यावतीनं करण्यात येत आहे. यासाठी महानगरपालिकेच्या ५४ एकर वरील १६७० वृक्षांवर पिवळ्या रंगाची फुली मारली असून त्यापैकी ४० टक्के वृक्षांवर कुऱ्हाड चालवली जाणार आहे. त्यामुळं वृक्षप्रेमींनी आंदोलन सुरू केलं. तसंच वृक्ष तोडू नयेत, यासाठी त्यांनी नाशिक महानगरपालिकेत ४०० हरकती दाखल केल्या होत्या. याची दखल घेत मंत्री गिरीश महाजन यांनी वृक्षप्रेमींची भेट घेत त्यांची समजूत काढली.

३१ ऑक्टोबर २०२६ रोजी ध्वजारोहण सोहळ्यानं अधिकृतरित्या कुंभमेळ्यास सुरुवात होईल. त्यानंतर देशभरातून साधू महंतांचे आगमन होईल. नाशिकमध्ये वैष्णव पंथाच्या तीन आखाड्यातील साधू पंचवटी येथील गोदातीरी स्नान करतात. त्यांना राहण्यासाठी साधूग्राममध्ये नियोजन केले जाते. याच पार्श्वभूमी महानगरपालिकेने साधूग्रामच्या विकासासाठी राष्ट्रसंत जनार्दन स्वामी आश्रम ते बटुक हनुमान मंदिरापर्यंतच्या परिसरातील वृक्षांची मोजणी केली. त्यात सर्वाधिक बाभूळ वृक्ष व झुडूप असून साधुग्राम साठी हा भूखंड मोकळा करण्याची गरज असल्यानं झाडांची कत्तल केली जाणार आहे.

# धक्कादायक प्रकार, पुण्यात १६ जेष्ठ नागरिकांना उघड्यावर टाकले

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील सामाजिक सुरक्षेच्या यंत्रणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी घटना समोर आली आहे. शहरातील १६ वयोवृद्ध रुग्णांना योग्य देखभालीचे आश्वासन देणाऱ्या एका संस्थेकडून अक्षरश: रस्त्यावर सोडून दिल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

ससून रुग्णालयातून 'आस्क ओल्ड एज होम' या दादासाहेब गायकवाड यांच्या संस्थेकडे काही दिवसांपूर्वी हे जेष्ठ नागरिक सोपवण्यात आले होते. संस्थेची नोंद धर्मादाय आयुक्त कार्यालयात असली तरी प्रत्यक्षात फुरसुंगी येथे चालणाऱ्या वृद्धाश्रमाची परिस्थिती अत्यंत दयनीय असल्याचा आरोप करण्यात येत आहे. सरकारने आपल्या संस्थेसाठी मोफत जागा उपलब्ध करून द्यावी, अन्यथा वृद्धांची काळजी घेता येणार नाही, असा दावा करत गायकवाड यांनी या रुग्णांना भारत फोर्ज कंपनीजवळील मोकळ्या जागेतच आणून ठेवलं.

कडाक्याच्या थंडीत या १६ वृद्धांना उघड्यावर सोडण्यात आले होते. त्यापैकी काहींना गंभीर जखमा असून त्यातून रक्त वाहत असल्याचे दृश्य पाहणाऱ्यांच्या हृदयाला चटका लावणारे होते. ससून रुग्णालयाकडून सांभाळासाठी सोपवलेले इतर रुग्ण या ठिकाणी आढळून आले नाही. त्याबाबत विचारणा केली असता गायकवाड आणि ससून रुग्णालयाचे अधिकारी परस्परांवर जबाबदारी ढकलताना दिसले.

दरम्यान, एका वृद्ध रुग्णाला पाणी पाजत असलेल्या महिलेला पत्रकारांनी विचारणा केली असता ती त्यांची मुलगी असल्याचे सांगितले. मात्र वडिलांना घरी का नेत नाही, याबाबत तिने मौन बाळगल्याने संताप व्यक्त होत आहे.

घटनेची दखल घेत समाजकल्याण खात्याने हस्तक्षेप केला असून दादासाहेब गायकवाड यांच्या फुरसुंगी येथील आश्रमाला काही मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे १६ पैकी १५ वृद्धांना पुन्हा त्या आश्रमात हलवण्यात आले, तर एकाला उपचारांसाठी पुन्हा ससून रुग्णालयात नेण्यात आले आहे. पुढील काळात अशी घटना पुन्हा घडू नये, यासाठी योग्य ती खबरदारी घेण्यात येणार असल्याचे समाजकल्याण आयुक्त दीपा मुंडे यांनी स्पष्ट केले.

या सगळ्या गोंधळात प्रकाश पुरोहित नावाचे एक ज्येष्ठ नागरिक मात्र बेपत्ता झाल्याचे समोर आले आहे.

# सोनम कपूरनं दुसऱ्या गरोदरपणाची केली घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेत्री सोनम कपूर आता सोशल मीडियावर चर्चेत आली आहे. अनिल कपूरची मुलगी वयाच्या ४०व्या वर्षी दुसऱ्यांदा आई होणार आहे. रांझणा या चित्रपटातील अभिनेत्रीनं सोशल मीडियावर एका अनोख्या शैलीत तिच्या गरोदरपणाची घोषणा केली. सोनम कपूरनं गुरुवारी इंस्टाग्रामवर तिच्या बेबी बंपचे काही फोटो शेअर केले आणि लिहिलं, आई. इतकेच नाही तर तिनं सोशल मीडियावर तिचे दुसरे मूल कधी जगात येणार आहे याबद्दलही माहिती आपल्या चाहत्यांबरोबर शेअर केली आहे. आता सोनम कपूरची ही पोस्ट पाहिल्यानंतर अनेकजण तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करत आहेत. याशिवाय अभिनेत्रीनं तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर फोटो शेअर करत लिहिलं, कमिंग स्प्रिंग २०२६.

सोनम कपूर होणार पुन्हा एकदा आई : दरम्यान पुढील वर्षी वसंत ऋतूमध्ये सोनम आणि आनंदच्या आयुष्यात एक फुल उगवणार आहे. दरम्यान ऑगस्ट २०२२ मध्ये, सोनम आणि पती आनंद आहुजा हे पालक बनले होते. या दोघांना ३ वर्षांचा मुलगा आहे. दरम्यान आनंदशी लग्न केल्यानंतर, सोनम ही कधी भारत, नाहीतर अमेरिकेत राहते. दरम्यान अभिनेत्रीनं तिच्या गरोदरपणाची बातमी शेअर करण्यासाठी राजकुमारी डायनापासून प्रेरित गुलाबी ड्रेस निवडला. तिची बहीण रिया कपूरनं स्टाईल स्टेटमेंटमध्ये मदत केली. आता सोनमची ही पोस्ट अनेकजण लाईक करत आहेत. सोशल मीडियावर व्हायरल झालेला तिच्या फोटोचेही अनेकजण कौतुक करत आहेत.

सोनम कपूरबद्दल : दरम्यान सोनमनं दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांच्या २००५ मध्ये आलेल्या ब्लॅक चित्रपटातून सहाय्यक दिग्दर्शक म्हणून तिच्या कारकिर्दीला सुरुवात केली. २००७ मध्ये भन्साळींच्या रोमँटिक ड्रामा सावरियाद्वारे तिनं चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. या चित्रपटामध्ये तिच्याबरोबर रणबीर कपूर मुख्य भूमिकेत होता. अभिनेत्रीचा पहिला चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला. यानंतर तिनं आय हेट लव्ह स्टोरीज, भाग मिल्खा भाग, संजू, प्रेम रतन धन पायो, नीरजा आणि वीरे दी वेडिंग सारख्या चित्रपटांमध्ये काम केलं. तिचे हे चित्रपट खूप गाजले. आता अनेक दिवसांपासून सोनम कपूरनं चित्रपटांमध्ये काम केलं नाही.

# अनाथ बालकांच्या पालकत्वासाठी प्रतिपालकत्व योजना

प्रत्येक बालकाला प्रेमळ कुटुंब मिळावे, हा त्याचा अधिकार आहे. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम आणि नियमांच्या तत्वानुसार प्रत्येक मुलाला घर मिळावे, कुटुंबात मुलांचे संगोपन व्हावे आणि अनाथालय, बालआश्रम, बालगृह, निरीक्षणगृह हे समाजातील दुर्लक्षित आणि देखभालीची आवश्यकता असणाऱ्या बालकांसाठी शेवटचा पर्याय असावा, हे कायद्याचे तत्व आहे. मात्र समाजातील अनेक बालके बेसहारा व निराश्रीत होऊन संस्थेत राहुन आपले जीवन जगत असतात. अशा बालकांना कौटुंबिक वातावरण मिळावे यासाठी प्रतिपालकत्व योजना राबविण्यात येत आहे.

केंद्र शासनाने बालकाची काळजी व संरक्षणासाठी बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ व सुधारित २०२१ कार्यान्वित केला आहे. या कायद्यातील कलम २ मध्ये विधीसंघर्षग्रस्त बालक आणि काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना यथासंभव त्यांना आवश्यक सुविधा पुरवून पुनर्वसनाद्वारे त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. या बालकांच्या पुनर्वसनाकरीता संस्थेंतर्गत आणि संस्थाबाह्य अशा दोन प्रकारे सुविधा



पुरवून विकास करायचा प्रयत्न करण्यात येत आहे.

अर्जदारांसाठी पात्रता:

अर्जदारांसाठी काही पात्रता निकष ठरविण्यात आले आहेत. त्यानुसार अर्जदार हे शारीरिक, मानसिक, भावनिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम असावेत, अर्जदारांना कोणतीही जीवघेणी वैद्यकीय स्थिती नसावी, अर्जदार हे कोणत्याही स्वरुपाच्या गुन्हेगारी कृत्यामध्ये किंवा कथितरित्या दोषी नसावे, विवाहित जोडप्याच्या बाबतीत दोन्ही जोडीदारांची संमती असणे आवश्यक आहे. एकल महिला ही मुलगा किंवा मुलगी दोन्ही पैकी कोणाचेही निवड करु शकते, परंतु एकल पुरुष फक्त मुलाची निवड करु शकतो. अर्जदार हे प्रेमळ, काळजी घेणारे आणि मुलाच्या वाढीसाठी फायदेशीर असे कौटुंबिक वातावरण तयार करण्यासाठी वचनबध्द असणे गरजेचे आहे.

मुलांचे पालनपोषण करण्यासाठी वयाचे निकष:

सहा वर्षापेक्षा जास्त आणि १२ वर्षापर्यंतचे मुले असल्यास समिश्र विवाहित जोडी अर्जदारांचे किमान वय हे ७० वर्ष, तर एकल वय-३५ वर्ष असावे आणि कमाल वय ११० वर्ष, एकल वय -५५ वर्ष असावे. १२ वर्षापेक्षा जास्त आणि १८ वर्षापर्यंतचे मुले असल्यास संमिश्र विवाहित जोडी अर्जदारांचे वय किमान ७० वर्ष, तर एकल वय ३५ वर्ष आणि कमाल ११५ वर्ष-एकल वय-६० वर्ष असावे.

अर्ज कसा आणि कुठे करावा- मुलांचे संगोपन करण्यास इच्छुक पालकांनी ... या ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी करुन पालकांनी पोर्टलवरील मार्गदर्शक तत्वांच्या अनुसूची १ नुसार आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.

अर्ज केल्यानंतरची प्रक्रिया- ऑनलाईन अर्ज केल्यानंतर सदर अर्ज हा जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांचे पोर्टला दिसल्यानंतर अर्जाची पडताळणी होईल. सदर अर्जाची पडताळणी झाल्यानंतर जिल्हा बाल संरक्षण कक्षामार्फत नमुना ३० नुसार गृह अभ्यास अहवाल पूर्ण केला जाईल. गृह भेट अहवाल पोर्टलवर अपलोड केल्यानंतर अर्जदारांनी निवडलेल्या बालक किंवा बालिका यांची योग्यतेची शिफारस बाल कल्याण समिती, बुलढाणा यांच्याकडे करावी. सदर शिफारसी नंतर बाल कल्याण समिती मार्फत पालकांना बालक, बालिका पालनपोषणासाठी देण्यात येईल.

पालनपोषणाचा कालावधी- अल्पकालीन प्रायोजकत्वाचा कालावधी हा एक वर्ष असेल तर, दिर्घ कालवधी हा एक वर्षापेक्षा जास्त आणि पालक कुटुंबाशी मुलाच्या सुसंगततेच्या मुल्यांकनाच्या आधारे बालक, बालिका वयाच्या १८ वर्षापर्यंत ठेवता येईल.

प्रायोजकत्वाची समाप्ती- बाल कल्याण समिती, प्रायोजकत्व आणि प्रतिपालकत्व मंजुरी समितीची शिफारस आणि जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या अहवालावर विचार केल्यानंतर पालनपोषणाची नियुक्ती समाप्त करण्याचा अधिकार राहील.

कायमस्वरुपी दत्तक विधान- अर्जदारांनी प्रतिपालकत्व योजनेअंतर्गत जर बालक, बालिका पालनपोषणासाठी घेतलेले असेल आणि पालकांच्या काळजीच्या कालावधीत मुलांचे पालनपोषण कुटुंबासोबत चांगल्याप्रकारे जुळवुन घेतलेल्या प्रकरणांमध्ये आणि पालक कुटुंब व पालनपोषणासाठी असलेले बालक, बालिका दोघेही दोन वर्षाच्या कालावधीनंतर दत्तक घेण्यास पात्र असु शकतात.

अधिक माहितीसाठी जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बस स्टँड मागे, मुट्ठे ले आऊट, डॉ जोशी नेत्रालय, बुलढाणा येथे किंवा दुरध्वनी क्रमांक ०२७६२-२९९३६६ किंवा dcpubuldana@gmail.com या मेलवर संपर्क साधावा.

**: संकलन :**
**सतिश आनंदराव बगमारे**
**उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय, बुलढाणा**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# टोयोटा किर्लोस्कर मोटार कंपनी आणि व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयामध्ये सामंजस्य करार

## ४५ आयटीआयमध्ये सुसज्ज प्रयोगशाळांची उभारणी; ८ हजार विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी

**दैनिक आपला विदर्भ**



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातल्या तरुणांना दर्जेदार रोजगाराभिमुख औद्योगिक प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराच्या जागतिक संधी निर्माण करण्याच्या कौशल्य विकास विभागाच्या उद्दिष्टानुसार मंत्रालयात कौशल्य, रोजगार व उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या उपस्थितीत टोयोटा किर्लोस्कर मोटार कंपनी आणि व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयामध्ये सामंजस्य करार करण्यात आला.

या करारान्वये टोयोटा किर्लो स्कर मोटार कंपनी राज्यातील ४५ आयटीआय संस्थांमध्ये (एलएमव्ही) हलकी वाहन तंत्रज्ञ अभ्यासक्रमांसाठी सुसज्ज प्रयोगशाळांची उभारणी करणार असून तेथे शिक्षकांना प्रशिक्षित करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे ८ हजार आयटीआय विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

कौशल्य मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या मार्गदर्शनात टोयोटा-किर्लो स्कर कंपनीचे वरिष्ठ उपाध्यक्ष विक्रम गुलाटी आणि व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालिका माधवी सरदेशमुख यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. येत्या दोन महिन्यात कंपनीकडून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असून मार्च २०२६ पर्यंत पहिल्या टप्प्यात १३ प्रयोगशाळा सुरु करण्यात येणार असल्याची माहिती कंपनीचे वरिष्ठ उपाध्यक्ष विक्रम गुलाटी यांनी दिली. तर तीन टप्प्यात उर्वरित प्रयोगशाळा सुरु करण्यात येणार आहेत.

राज्यातल्या आयटीआयच्या विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विभाग नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असून विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या दर्जेदार प्रशिक्षणामुळे रोजगाराच्या जागतिक संधी उपलब्ध होतील असा विश्र्वास यावेळी कौशल्य मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी व्यक्त केला. तसेच राज्य शासनाकडे आयटीआयच्या माध्यमातून उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा, उद्योग क्षेत्रातील ज्ञान, अनुभव या सहभागातून कुशल व रोजगारक्षम मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी उद्योग समूहांचे सहकार्य आवश्यक असल्याचे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले. पुढच्या काळात या अनुषंगाने अनेक रोजगाराभिमुख सामंजस्य करार होतील, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

यावेळी कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाचे सह संचालक सतीश सूर्यवंशी, टोयोटा किर्लोस्कर कंपनीचे उपाध्यक्ष रमेश राव, कंपनीचे मानव संसाधन व्यवस्थापक भास्कर पै आणि मुख्य व्यवस्थापक रवी सोनटक्के उपस्थित होते.

## नवीन फौजदारी कायद्यांवरील प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन



**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्र शासनाने भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम हे नवीन फौजदारी कायदे १ जुलै २०२४ पासून देशभरात लागू करण्यात आले आहेत. या नवीन फौजदारी कायद्यांविषयी जनसामान्यांना माहिती व्हावी, याकरिता १९ ते २३ नोव्हेंबर २०२५ दरम्यान पाच दिवसीय प्रदर्शनाचे आयोजन आझाद मैदान येथे करण्यात आले आहे. हे प्रदर्शन २३ नोव्हेंबर पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ६ दरम्यान खुले असणार आहे. प्रदर्शनामध्ये नवीन फौजदारी कायद्यांवर आधारित नियंत्रण कक्ष, न्याय सहाय्यक प्रयोगशाळा संचालनालय, न्याय वैद्यक व विष शास्त्र विभाग, अभियोग संचालनालय, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, उच्च न्यायालय, मध्यवर्ती कारागृह यांचे स्टॉल्स आहेत. प्रदर्शनामध्ये प्रात्यक्षिकाद्वारे नाट्य रूपांतर पद्धतीने माहिती देण्यात आली आहे. या प्रदर्शनाला सर्व नागरिकांनी भेट द्यावी. विशेषतः विधि शाखेचे विद्यार्थी, वकील यांनी भेट देत नवीन कायद्याविषयी माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन गृह विभागाचे प्रधान सचिव अनुप कुमार सिंग यांनी केले आहे.

## मालेगाव चिमुरडी अत्याचार आणि हत्या प्रकरणी कोर्टातून मोठी अपडेट, आरोपीची हुशारी पण घडले उलटचे!

**मालेगाव/प्रतिनिधी :** नाशिक जिल्ह्यातील मालेगावमध्ये एका ३ वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार आणि हत्या प्रकरणी घडामोडींना वेग आला आहे. या प्रकरणी चौथ्या दिवशीही मालेगावकरांनी बंद पुकारला होता. या प्रकरणातील आरोपीला न्यायालयात हजर करण्यात येणार होतं. त्यामुळे गावकऱ्यांनी कोर्टाच्या परिसरात तुफान गर्दी केली होती. अखेरीस मोठ्या बंदोबस्तात या नराधमांना कोर्टासमोर हजर केलं, त्याला ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. अवघ्या महाराष्ट्राला हादरावून सोडणाऱ्या मालेगाव ३ वर्षाच्या चिमुरडी अत्याचार आणि हत्या प्रकरणी मालेगावमध्ये चौथ्या दिवशीही गावकऱ्यांची तीव्र संतापाची लाट आहे. आरोपी विजय खैरनारला आज मालेगावच्या अप्पर जिल्हा न्यायालयात हजर करण्यात येणार होतं. पण आरोपीला कोर्टात हजर करण्याची माहिती मिळताच नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. आरोपीला आमच्या हवाली करा, अशी घोषणाबाजी करत महिलांनी कोर्टाचा परिसर दणाणून सोडला. गर्दीमुळे कोर्टाचे दोन्ही गेट बंद करण्यात आले होते. नागरिकांमध्ये निर्माण झालेला रोष पाहून आरोपीला कोर्टात हजर करणे कठीण झाले. अखेरीस व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आरोपीला हजर करण्यात आले. आज कोर्टामध्ये आरोपीला सात दिवसांची पोलीस कोठडी देण्यात यावी अशी मागणी तपास अधिकाऱ्यांनी केली होती. आरोपीलाा न्यायालयात हजर करणार होते. पण, संपूर्ण तालुक्यामधून मोठ्या संख्येनं लोकांनी गर्दी केली होती. लोकांनी तुफान गर्दी केली होती. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून तपास अधिकाऱ्यांनी आरोपीला व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे कोर्टात हजर करण्यात यावे अशी मागणी पत्राद्वारे केली होती. कोर्टाने मागणी मंजूर केली आणि व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सुनावणी झाली. रिमांड रिपोर्ट सादर केला होता.

## कोल्हापुरात भाजप आणि काँग्रेसची युती, एकनाथ शिंदेना पुन्हा चकवा;राजकारण तापले



**दैनिक आपला विदर्भ**

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात स्थानिक पातळीवर नवीन राजकीय समीकरणे समोर येत आहे. मात्र सत्ताधारी महायुतीच्या गोटात प्रचंड अंतर्गत खदखद असल्याची माहिती समोर आली आहे. भाजप आणि शिवसेनेच्या बिनसल्याचे चित्र दिसत असताना कोल्हापुरात भाजपने मोठी खेळी केली आहे. कोल्हापूर नगरपालिकेत चकवा देणारी युती समोर आली आहे. एकमेकांचे कट्टर विरोधक असणारे भाजप आणि काँग्रेस पक्षाची युती झाली आहे.

कोल्हापुरातील शिरोळ आणि जयसिंगपूर नगरपालिकेत भाजप आणि काँग्रेस एकत्र आले आहेत. महादेव महाडिकांची ताराराणी आघाडी आणि सतेज पाटलांचा काँग्रेस गट एकत्रीतपणे निवडणुकीला सामोरे जात आहे. आमदार राजेंद्र पाटीस यड्रावकर यांच्या विरोधात शिरोळ तालुक्यात मोट बांधली आहे. राज्यामध्ये आणखी एका ठिकाणी शिवसेना शिंदे गटाला एकटे पाडण्यात आले आहे.

शिंदेची शिवसेना पुन्हा एकटी पडली?

कोल्हापूर जिल्ह्याला काँग्रेस नेते आमदार सतेज पाटील आणि महाडिक गटाचे राजकीय वैर माहीत आहे. शिरोळ तालुक्यात ताराराणी आघाडी म्हणजेच भाजपचे पदाधिकारी राजकारणात सक्रिय आहेत. मात्र हे दोन परस्परविरोधी गट नगरपालिका निवडणुकांमध्ये एकत्र आले आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून भाजपचे नेते आणि काँग्रेसचे नेते जयसिंगपूर आणि शिरोळ नगरपालिकांमध्ये आघाडी करणार असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. अखेर आज अर्ज माघारीच्या काही तास अगोदर या प्रमुख नेत्यांनी बैठक घेत जयसिंगपूर विकास आघाडीच्या माध्यमातून ही निवडणूक चढवण्यात येणार असल्याचे समोर आले आहे.

शिवसेना शिंदे गटाचे आमदार राजेंद्र यड्रावकर हे महायुतीचे आमदार आहेत. मात्र स्थानिक भाजप पदाधिकाऱ्यांशी आणि जल्हाध्यक्ष राजवर्धन नाईक निंबाळकर यांच्याशी असलेल्या राजकीय वैरामुळे भाजपने त्यांच्या विरोधात भुमिका घेतली आहे. काँग्रेस आणि भाजपने एकत्र आल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

## क्रीडा व युवक कल्याण विभागामार्फत ६, ७ डिसेंबरला ‘ग्लोबल युथ फेस्टिव्हल २०२५’

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** शहरातील तरूणांसाठी ६ आणि ७ डिसेंबर रोजी जिओ वर्ल्ड गार्डन, वांद्रे येथे क्रीडा व युवक कल्याण विभागामार्फत श्रीमद राजचंद्र मिशन यांच्या सहकार्याने ग्लोबल युथ फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड.माणिकराव कोकाटे यांच्या उपस्थितीत हा सोहळा होणार आहे. यामध्ये १०,००० पेक्षा जास्त तरुण मन:शांती, ॲडव्हेंचर, आर्ट्स, कल्चर, संगीत, योग-ध्यान, समाजाभिमुख उपक्रम आणि (स्किल-बिल्डिंग) कौशल्य विकास यांसारख्या अनोख्या उपक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत.

क्रीडा व युवक कल्याण विभागाच्या सहकार्याने, हा देशातील आघाडीचा युवक उत्सव ठरणार आहे. आत्मपरिवर्तनातून समाजपरिवर्तन घडवण्यासाठी हा उत्सव तरुणांची चळवळ म्हणून उभी राहील.


लंडन आणि पुण्यासारख्या शहरानंतर ग्लोबल यूथ फेस्टिव्हल या वर्षी मुंबई येथे आयोजित करण्यात येत आहे. ग्लोबल यूथ कम्युनिटी ही २० पेक्षा जास्त देशांमध्ये आणि १७० पेक्षा जास्त शहरांमध्ये पसरलेली तरुणांची एक प्रेरणादायी चळवळ आहे. क्रिएटर्स, व्यावसायिक, कलाकार, उद्योजक आणि चेंजमेकर यांनी एकत्रित येऊन ग्लोबल यूथ कमिटी तयार केली आहे.

हजारो लोकांना एकत्र आणणारे सायकलथॉनसारखे उपक्रम, ग्रामीण विकासासाठी केलेले अनेक प्रकल्प, आरोग्य, प्राणी-कल्याण, शिक्षण यांसाठी उभारलेले उपक्रम यामुळे हा उत्सव केवळ मनोरंजन नसून प्रभाव आणि परिवर्तनाचा उत्सव ठरणार आहे. संगीत किंवा कला अशा एखाद्या विषयापुरते मर्यादित न राहता, ग्लोबल युथ फेस्टिवल हा समग्र अनुभव देणारा उत्सव आहे. महिला सक्षमीकरण, बालशिक्षण, ग्रामीण




विकास, प्राणी-कल्याण, पर्यावरण संवर्धन यांसारख्या समाजोपयोगी उपक्रमांचे प्रात्यक्षिक देशातील सर्वात मोठा आऊटडोअर साउंड हीलिंग अनुभव, संगीत, कला, ध्यान, जर्नलिंग, पॉटरी, ड्रम सर्कल अशा मजेशीर पॉप-अप ॲक्टिव्हिटीज यांचा समावेश असणार आहे. अधिक माहितीसाठी .. येथे भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## शब्दकोडे क्र. 15



आडवे शब्द

१. पोलिस ६. आत्याचा मुलगा ९. वजनदार १०. फळातील द्रव ११. सरकारी जमिनीची व्यवस्था पाहणारा १५. क्रिकेटमधील धाव १६. प्रतिबंध, विरोध १८. तमाशा १९. तोंडाचा एक भाग २१. रम्य २२. वेडावाकडा २४. मातीचा कण २५. चर्चा २७. भारतात वास्तव्य करणारे तिबेटी धर्मगुरु २८. शेतकरी (हिंदी) ३०. हाडांचा सापळा ३२. प्रत्येक दिवशी ३४. धमकी, श्वास ३६. व्रत, नियम ३८. चेहरा ४०. रामाच्या चरित्रावरील नाट्यप्रयोग ४२. शंकर ४४. मृत्यूनंतर शरीराचे केलेले दान ४६. नवरसातील एक रस ४७. विनंती ४९. आनंद ५०. ट्रीपला मराठी शब्द ५२. अजगर ५३. काळ्या तोंडाचे माकड ५५. सत्त्व ५७. शहाणा, चलाख ५९. घरोघर ६०. श्रीरामाचे स्तोत्र ६२. भितीवरून सरपटणारा प्राणी ६३. घर ६४. महिना ६५. समशेर, ढाल ---- ६७. चालू दिवस ६८. लहानसहान ७१. अभिनेता ७२. पंख ७३. वर्ण ७५. गाणे ७७. नोकरी करणारा ८०. जरीने भरलेले वस्त्र ८१. मांडणी, सजावट ८२. भीतीने होणारी थरथर ८३. पुष्पराग, सत्त्व, तमबरोबरचा तिसरा गुण

उभे शब्द

१. मावळ्यांची युद्धातील प्रोत्साहनपर घोषणा २. दिवस ३. जावई (हिंदी) ४. दारूचा एक प्रकार ५. यावर्षी (ग्रा.) ७. तीन दिवसाचे फूल ८. अवधान, लक्ष ९. भारताचे पहिले पंतप्रधान १२. चटकन १३. धट्टाकट्टी १४. धोबी १७. जास्तीत जास्त व कमीत कमी २०. हिंदीत मोठा २१. मला, वरचा माळा २३. संध्याकाळ २४. एखाद्याच्या बाजूने बोलणे, वकिली करणे २६. त्याप्रमाणे २९. मोठी नदी ३१. डावखोरा ३३. चित्तथरारक ३५. स्वत:ला ३७. मृत्यू ३९. रावण ४१. राजवाडा ४३. जल ४४. शरीर ४५. धमनी ४६. हाताचा तळवा ४७. लग्नसोहळा ४८. आशीर्वाद ५१. पैगंबर, राजा यांच्या नावापुढील बहुमानाचा शब्द ५२. पूर्ण भेदून जाणे ५४. नाशिकजवळून वाहणारी नदी ५६. मध्यम प्रमाण ५८. मुलगा, तनय ६१. धुणे ६४. मत्स्य ६६. मार्गक्रमण ६७. नौदल ६८. भाकरीचे एक धान्य ६९. खबदाड ७०. चषक ७२. अन्य, दुसरा ७४. मगज ७६. पान, पाकळी, तुकडी ७८. रचलेले कारस्थान ७९. निद्रा, झोप

### शब्दकोडे क्र. 14 चे उत्तर

आडवे उत्तर

१.रखवालदार ६.मजल दरमजल १२.सर १३.गरजवंत १४.वरण १५.लालन १७.पात १८.लता २०.शतक २२.जबरदस्त २४.माय २५.आभाळ २७.कटाप २८.बाठ २९.मका ३०.पळस ३१.सरसावणे ३३.उदर ३४.रसद ३६.दलदल ३७.दामोदर ३८.रत ४०.पारवा ४१.फार ४३.भारतीय ४५.डरपोक ४८.हत्ती ४९.आवा ५१.कळकळ ५२.नर ५३.अंकगणित ५५.आळस ५६.उद्धव ५८.मारा ५९.डर ६१.सगा ६२.मदन ६५.समोरासमोर ६८.सागर ७०.तवा ७१.जबाबदारी ७२.कालहरण ७४.अदाकार ७५.ताबडतोब ७६.खेटर ७७.गे ७८.पण

उभे उत्तर

१.रसना २.खर ३.लगत ४.दार ५.रजनी ६.मतलब ७.लव ८.दरखास्त १०.जलाशय ११.ललत १६.नकलाकार १७.पातळसर १९.तारा २१.मकरंद २२.जप २३.दर २४.माठ २५.आपपराभव २६.भाळ २८.बाणेदार २९.मदर ३१.सलवार ३२.रद ३३.उदबत्ती ३५.समय ३६.दरड ३९.तर ४२.सांबार ४४.तीरकमान ४६.पोकळ ४७.कळस ४९.आणि ५०.वातड ५२.नवसागर ५४.गरा ५६.उगा ५७.कमतरता ६०.रसदार ६१.सरकारी ६३.दवा ६४.बोंबाबोंब ६६.मोरी ६७.सरदार ६८.साहस ६९.रणरण ७३.आड ७४.अट

# तिरंगी लढतीत किशोरभाऊ गारोळे यांचे पारडे भक्कम!

## मेहकर नगरपरिषद निवडणूक : मतदारांकडून उत्स्फूर्त पाठिंबा

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधी :** शहराचे आराध्य दैवत श्री बालाजी शारंगधर यांचे आशीर्वाद आणि हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन अनेक वर्षे सकारात्मक कार्य करणारे नाव म्हणजे किशोरभाऊ गारोळे. ''८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण'' या बाळासाहेबांच्या विचारांना कृतीत उतरवत त्यांनी शहरवासीयांच्या मनात ठाम स्थान निर्माण केले आहे.

शांत, संयमी आणि सर्वांना सोबत घेऊन चालणारे नेतृत्व म्हणून ओळखल्या जाणाऱ्या किशोरभाऊ गारोळेंना नगरपरिषद अध्यक्षपदाच्या उमेदवारीच्या पहिल्याच दिवशी जनतेचा जबरदस्त प्रतिसाद मिळाला. त्यामुळे तिरंगी लढतीत त्यांचे पारडे दिवसेंदिवस अधिकच जड होताना दिसत आहे.

मेहकर शहराचा वेगाने वाढणारा विस्तार आणि विकासाची अपार क्षमता असूनही, गेल्या काही वर्षांत राजकीय उदासीनतेमुळे विकास ठप्प झाला होता. काँग्रेसच्या सत्ताकाळात शहराच्या प्रगतीसाठी ठोस पाऊल उचलण्यात आले नसल्याची नाराजी जनतेत होती. याच असंतोषातून शहरवासीयांनी विकासाभिमुख नेतृत्व म्हणून किशोरभाऊ गारोळेंकडे मोठ्या आशेने पाहिले आहे.

येणाऱ्या २ डिसेंबरच्या नगराध्यक्ष निवडणुकीत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे विश्वसनीय चेहरे म्हणून किशोरभाऊ मैदानात उतरले आहेत. लोकांच्या अडचणी ओळखून त्यांचे त्वरित निवारण करण्याची त्यांची कार्यपद्धती मतदारांना भावली असून, प्रचाराच्या पहिल्या टप्प्यातच त्यांनी आघाडी घेतली आहे. त्यामुळे विरोधकांची धडकी भरली असून, शहरात त्यांच्याच चर्चेला उधाण आले आहे.

**मेहकर नगरपरिषदेवर दीर्घकाळ काँग्रेसचे वर्चस्व होते आणि त्यांचा एक मजबूत चाहता वर्ग आजही विद्यमान आहे. मात्र, विकासाबाबतच्या उदासीनतेमुळे आणि सक्षम नेतृत्वाच्या अभावामुळे काँग्रेसचे शेकडो कार्यकर्ते व पदाधिकारी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षात मोठ्या संख्येने दाखल झाले. या प्रवेशामुळे किशोरभाऊ गारोळेंची बाजू आणखी मजबुत झाली असून, विरोधकांच्या चिंतेत भर पडली आहे.**

## कांदिवली शताब्दी रुग्णालयामधील ईसीजी विभाग बंद; तंत्रज्ञ नसल्याने रुग्णांचे हाल

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महानगरपालिकेच्या कांदिवलीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महानगरपालिका रुग्णालयातील (शताब्दी) ईसीजी तंत्रज्ञ रजेवर गेल्याने काही दिवसांपासून हा विभाग बंद आहे. त्यामुळे रुग्णालयामध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना ईसीजी काढण्यासाठी मालाडच्या एम. डब्ल्यू. देसाई रुग्णालय किंवा बोरिवलीतील भगवती रुग्णालयामध्ये पाठविण्यात येत आहे. त्याचा फटका रुग्णांना बसत आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरीय रुग्णालयांमध्ये अनेक पदे रिक्त आहेत. त्याचा परिणाम रुग्ण सेवेवर होत आहे. कांदिवली शताब्दी रुग्णालयामध्ये ईसीजी तंत्रज्ञाची दोन पदे मंजूर आहेत. त्यापैकी एक पद भरले आहे. परिणामी, रुग्णालयामध्ये फक्त सकाळच्या सत्रामध्येच रुग्णांचे ईसीजी काढण्यात येत होते. त्यामुळे रात्रीच्या पाळीमध्ये रुग्णांचे ईसीजी डॉक्टर व परिचारिकांच्या माध्यमातून काढण्यात येत होते. त्यातच आता ईसीजी तंत्रज्ञही रजेवर गेल्याने रुग्णालयातील ईसीजी विभाग बंद झाला आहे.

## शिक्षक पात्रता परीक्षा २३ नोव्हेंबरला

### बुलढाण्यात १८ केंद्रांवर ११ हजार २८३ परीक्षार्थी; परिक्षेसाठी प्रशासन सज्ज

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्यावतीने महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा रविवार दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी होणार आहे. जिल्ह्यातील १८ परीक्षा केंद्रांवर ११ हजार २८३ परीक्षार्थी परीक्षा देणार आहे. परिक्षेसाठी प्रशासन सज्ज असून शांततापूर्ण, पारदर्शक आणि आदर्श संचालन प्रक्रियेनुसार परीक्षा पार पाडण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहे.

परीक्षेसाठी पेपर-१ साठी ५ हजार ३०८ तर पेपर २ साठी ५ हजार ९७५ परीक्षार्थी प्रविष्ट झाले आहेत. सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्हीच्या माध्यमातून काटेकोर निरीक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी प्रत्येक परीक्षार्थीची मेटल डिटेक्टरद्वारे फ्रिस्कींग करण्यात येणार असून मोबाईल, स्मार्ट वॉच, कॅल्क्युलेटर आदी इलेक्ट्रॉनिक उपकरणांवर सक्त बंदी राहणार आहे.

परीक्षार्थ्यांची उपस्थिती बायोमेट्रिक फेस रिकग्निशन प्रणालीद्वारे नोंदवली जाणार असून, तांत्रिक कारणांसाठी पर्यायी प्रक्रिया केंद्र संचालकांच्या देखरेखीखाली राबवली जाईल. मुळ उमेदवाराऐवजी दुसऱ्या व्यक्तीने परीक्षेत प्रवेश केल्याचे आढळल्यास संबंधितांवर फौजदारी कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

एकाच उमेदवाराने विविध केंद्रांवर अनेक अर्ज भरल्यास त्याची पूर्वतपासणी पूर्ण करण्यात आली आहे. राज्यातील सर्व परीक्षा केंद्रे परीक्षा परिषद आणि संनियंत्रण कक्षाशी हॉटलाइनद्वारे जोडण्यात आली आहेत. संपूर्ण परीक्षेच्या कालावधीत जिल्हा व राज्य पातळीवरून सीसीटीव्हीद्वारे थेट निगरानी ठेवण्यात येणार आहे.

दरम्यान, परीक्षेसंबंधी कोणत्याही अफवा अथवा चुकीच्या माहितीवर विश्वास न ठेवता फक्त महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावरील सुचनांचेच अनुसरण करावे, असे आवाहन परिषदेतर्फे करण्यात आले आहे. परीक्षापूर्वी परीक्षार्थ्यास कोणतीही अडचण उद्भवल्यास जिल्हा परिषद बुलढाणा यांच्या प्राथमिक शिक्षण विभागात स्थापन करण्यात आलेल्या मदत कक्षाशी संपर्क साधावा, असे प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील यांनी कळविले आहे.

## जळगावात केळीच्या बागेत भयानक कांड, पोलिसांना टिप मिळाली, दृश्य पाहून पायाखालची जमीन सरकली!

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** सोन्याची राजधानी असलेलं जळगाव हे तिथल्या केळींच्या उत्पादनामुळेही जगभरात प्रसिद्ध आहे, पण याच जळगावमध्ये केळीच्या शेतात घडलेल्या एका घटनेमुळे खळबळ माजली आहे. मुक्ताईनगरच्या माणगावमध्ये केळीच्या शेतामध्ये दिसलेल्या दृश्यानंतर पोलिसांच्या पायाखालची जमीन सरकली आहे. केळीच्या बागेमध्ये अवैधरित्या गांजा पिकाची लागवड सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती, त्यानंतर जळगाव स्थानिक गुन्हे शाखा आणि मुक्ताईनगर पोलिसांनी गांजाची शेती उद्ध्वस्त केली. याप्रकरणी मुक्ताईनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.मुक्ताईनगर पोलिसांनी बुधवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास माणगावमधल्या शिवारात छापा टाकला, तेव्हा त्यांना केळी बागेच्या आडोश्याला गांजाची शेती मोठ्या प्रमाणावर केली गेल्याचे समजले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून गांजाचं पीक नष्ट केले आहे. तसेच याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून आरोपींचा शोध सुरू आहे.

# लोणार नगरपरिषद निवडणूक : संगीताताई मापारी यांच्या प्रचाराला उत्स्फूर्त जनसमर्थन

### शहरभर उत्साहाची लाट; मतदारांचा वाढता कल पाहता विरोधक गोंधळले

दैनिक आपला विदर्भ




**लोणार/प्रतिनिधी :** जगप्रसिद्ध खाऱ्या पाण्याच्या सरोवरासाठी ओळखल्या जाणाऱ्या लोणार शहरात नगरपरिषद निवडणुकीचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. येत्या २ डिसेंबरला होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (शिंदे गट) च्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार संगीताताई मापारी यांच्या प्रचाराला मिळणारे उस्फूर्त जनसमर्थन शहराचे लक्ष वेधून घेत आहे.

शहरातील प्रमुख चौक, गल्लीबोळ, बाजारपेठ तसेच उपनगरे सर्वत्र संगीताताईंच्या प्रचाराची धग स्पष्टपणे जाणवत आहे. त्यांच्या प्रचारफेऱ्यांदरम्यान नागरिकांचे जल्लोषपूर्ण स्वागत, महिलांचा वाढता सहभाग, युवकांची मोठ्या प्रमाणातील उपस्थिती यामुळे प्रत्येक ठिकाणी प्रचंड जनसमुदाय उसळल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, माजी आमदार संजय रायमुलकर, तसेच स्थानिक पातळीवरील नेतृत्व मा. प्रकाश मापारी, शिवसेना जिल्हाप्रमुख बळीभाऊ पांडुरंग सरकटे, शिवसेना शहरप्रमुख तसेच तालुका समन्वयक अशोक वारे यांच्या मार्गदर्शनामुळे संगीताताईंचा प्रचार अधिक जोमदार बनला आहे. पक्षाची संघटनशक्ती, वरिष्ठ नेत्यांचा अनुभव आणि शहरविकासावरचा सातत्यपूर्ण पाठपुरावा यामुळे संगीताताईंची उमेदवारी अधिक मजबूत ठरत असल्याचे जाणकारांचे मत आहे.

लोणार सरोवराच्या पर्यटन विकासासाठी आवश्यक सुविधा, शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, स्वच्छता, तसेच व्यापारी व पर्यटकांसाठी केंद्रित योजनांच्या उभारणीविषयी संगीताताई मापारी यांनी मांडलेले व्हिजन मतदारांना विशेष भावत आहे. त्यांची ''पर्यटन प्रगती लोणारची उन्नती'' ही विकासकल्पना शहरात चर्चेचा विषय ठरत आहे.

अर्ज दाखल करण्याच्या दिवशी काढलेल्या भव्य रॅलीने शहरात विक्रमी उत्साह निर्माण केला होता. शिस्तबद्ध शिवसैनिकांची उपस्थिती, महिलांचा उत्स्फूर्त सहभाग आणि तरुणांचा वाढता जोश यामुळे संगीताताई मापारी यांच्या नावाभोवती सकारात्मक वातावरण अधिक दृढ झाले आहे.

निवडणुकीला काहीच दिवस उरले असताना त्यांच्या प्रत्येक सभेला मिळणारा वाढता प्रतिसाद पाहता विरोधकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील राजकीय जाणकारही ''मापारी यांची आघाडी दिवसेंदिवस अधिक मजबूत होत आहे'' असे स्पष्टपणे सांगत आहेत.

### संगीताताई मापारी मजबूत नेतृत्व, स्वच्छ प्रतिमा आणि विकासाचा ठोस रोडमॅप

**केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, माजी आमदार संजय रायमुलकर, मा. प्रकाश मापारी, जिल्हाप्रमुख बळीभाऊ पांडुरंग सरकटे शहरप्रमुख, तालुका समन्वयक अशोक वारे यांच्या मार्गदर्शनाखाली संगीताताई मापारी जोरदार प्रचार करत आहेत. प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचून त्या लोणारला आधुनिक पर्यटन हब बनविणे, पायाभूत सुविधांचा विकास, आणि नागरिकांसाठी सक्षम व पारदर्शक प्रशासन देण्याचे आश्वासन देत आहेत. प्रचारातील वाढता जोर आणि मतदारांचा सकारात्मक प्रतिसाद पाहता त्यांच्या बाजूने वातावरण अधिक दृढ होत असल्याचे दिसून येत आहे.**

## वृत्तविशेष...

### मुख्य डाकघरात अत्याधुनिक एटीएम सेवा नागरिकांसाठी सुरु



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** येथील मुख्य डाकघराच्या आवारात नव्याने अद्ययावत स्वरूपात पुनः सुरू करण्यात आलेल्या एटीएम सेवेचा शुभारंभ डाकघर विभागाचे अधीक्षक गणेश अंभोरे यांच्या हस्ते आज करण्यात आला. डाक विभागाच्या तसेच इतर सर्व बँकांच्या ग्राहकांना २४ ७ सेवा देणारे हे एटीएम आता नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध झाले आहे.या उद्घाटन प्रसंगी सहायक अधीक्षक कैलास तायडे, सहायक अधीक्षक सतीश निकम, बुलढाणा मुख्य डाकघराचे पोस्टमास्टर आशीष इंगळे तसेच आयपीपीबी बुलढाणा शाखेचे वरिष्ठ प्रबंधक हिमांशु धल, तसेच डाक विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.डाक विभागाच्या ग्राहकांसह सर्वच बँकिंग ग्राहकांनी या अत्याधुनिक एटीएम सेवांचा लाभ घ्यावा. अशाच स्वरूपाची सेवा मुख्य डाकघर खामगाव येथेही सुरू करण्यात आली असून तेथील नागरिकांनीही या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन डाक अधीक्षक गणेश आभोरे यांनी केले.

### अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना अनुदानासाठी ई-केवायसी अनिवार्य, शेतकऱ्यांच्या खात्यात डिबीटीव्दारे अनुदान जमा करणे सुरु; ई-केवायसी करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यामध्ये जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांच्या खात्यात शासन स्तरावरून केंद्रभूत पद्धतीने थेट लाभार्थी हस्तांतरण प्रणालीमार्फत अनुदान त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू आहे.मात्र, अनेक पात्र शेतकरी लाभार्थ्यांनी आपले ई-केवायसी पूर्ण न केल्यामुळे त्यांचे अनुदान वितरित होऊ शकलेले नाही. अनुदान वितरणाची प्रक्रिया सुरू असून, ई-केवायसी पूर्ण झाल्यानंतरच संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम जमा केली जाणार आहे. त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांनी तातडीने जवळच्या आपले सरकार सेवा केंद्र येथे जाऊन आपले ई-केवायसी पूर्ण करावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी यांनी केले आहे.

### मौजे महमदवाडी येथील जमीन मिळकत प्रकरणी अहवाल सादर करण्याचे निर्देश



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मौजे महमदवाडी (ता. हवेली, जि. पुणे) येथील तक्रारप्राप्त जमीन मिळकतीबाबतचा सविस्तर अहवाल तत्काळ सादर करण्याचे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले. विधानभवनात आयोजित बैठकीस महसूल उपसचिव अजित देशमुख, हवेली तालुक्याचे उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंतराव माने, मंडळ अधिकारी मिलिंद सेठी, ग्राम महसूल अधिकारी स्वप्नील आंबेकर उपस्थित होते.मौजे महमदवाडी (ता. हवेली, जि. पुणे) येथील स.न. ४४, एकूण क्षेत्र ५ हेक्टर ९१ आर जमिनीच्या मिळकतीबाबतचे निवेदन प्राप्त झाले असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून, तक्रारकर्त्यांनी मांडलेल्या सर्व आक्षेपांसंदर्भात सविस्तर तपास अहवाल सात दिवसांत सादर करण्याचे निर्देश उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी प्रांत अधिकाऱ्यांना दिले. हवेली तालुक्यातील जमीन बेकायदेशीर ताब्यात घेतल्यासंदर्भात सात दिवसात सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देशही उपाध्यक्ष बनसोडे अधिकाऱ्यांना दिले.

### मुख्यमंत्री सचिवालयातील कर्मचारी राजेंद्र शिंदे यांना श्रद्धांजली

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री सचिवालयातील कर्मचारी राजेंद्र शिंदे यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोक संवेदना व्यक्त करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. तर मुख्यमंत्री सचिवालयातील अधिकारी-कर्मचारी यांनीही दिवंगत शिंदे यांना श्रद्धांजली अर्पण केली.मुख्यमंत्री सचिवालयातील कर्मचारी राजेंद्र शिंदे यांचे बुधवारी (दि.१९) हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मुख्यमंत्री सचिवालयात मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त मुख्य सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्यासह उपस्थित अधिकारी-कर्मचारी आदींनी श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या कुटुंबाप्रती संवेदना व्यक्त करत, या कठीण प्रसंगी संपूर्ण सचिवालय शिंदे कुटुंबाच्या पाठिशी असल्याची भावना व्यक्त केली.